<table>
<tr><td rowspan="5">MHAU060022862022</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१०.१०.२०२२</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१०.१०.२०२२</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">२४.०१.२०२५</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०२</td><td>०३</td><td>१५</td></tr>
</table>

**भाग –अ**

**कन्नड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात,**

**ता. कन्नड, जि. औरंगाबाद.**

**(पिठासीन अधिकारी काटकर विजया एन.एस.)**

**नियमित फौजदारी खटला क्र.३१४/२०२२.**

**निशाणी क्रमांक – ३२**

**महाराष्ट्र सरकार तर्फे**

**पिशोर पोलिस स्टेशन,**

ता.कन्नड, जि. औरंगाबाद. **अभियोगपक्ष**

**उपस्थीती** **डी.ए. शेळके**

**विरुध्द**

१. **गणेश महादु ब्राम्हणे**

वय : ३४ वर्ष, व्यवसाय – शेती.

२. **शंकर महादु ब्राम्हणे**

वय : ३६ वर्ष, व्यवसाय – शेती.

३. **अनिल महादु ब्राम्हणे**

वय : ३३ वर्ष, व्यवसाय – शेती.

४. **परमेश्वर नारायण दुधे ,**

वय : २८ वर्ष, व्यवसाय – शेती.

५. **रवि राजु दुधे,**

वय : २२ वर्ष, व्यवसाय – शेती.

**६. विष्णु नाना दुधे ,**

वय : २३ वर्ष, व्यवसाय – शेती.

आरोपी क्र. १ ते ३ रा. : जामडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

आरोपी क्र. ४ ते ६ रा. : रजाळवाडी, ता.सिल्लोड जि. औरंगाबाद.

**आरोपीतर्फे**

**उपस्थीती :–** **विधीज्ञ डी.डी.जोशी**

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.०१.०७.२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल तारीख | दि.०७.०७.२०२२ |
| दोषारापपत्र दाखल तारीख | दि.२०.०९.२०२२ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | दि.२३.०९.२०२४ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव ठेवण्याची तारीख | दि.२४.०१.२०२५ |
| न्यायनिर्णय | दि.२४.०१.२०२५ |
| शिक्षेबाबत तपशिल | आरोपीस निर्दोष सोडले. |

**आरोपीचे तपशिल.**

| अनु क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | कोणत्या गुन्हया अंतर्गत | दोषी अथवा निर्दोष | शिक्षे बाबत तपशिल | स्थान बद्दल वजावाट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश महादु ब्राम्हणे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | शंकर महादु ब्राम्हणे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | | | |
| ३. | अनिल महादु ब्राम्हणे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | परमेश्वर नारायण दुधे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| ५. | रवि राजु दुधे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |
| ६ | विष्णु नाना दुधे | ०५.०९.२०२२ | ०५.०९.२०२२ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभियोगपक्षातर्फे पुरावा

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | भारत पंडीत ब्राम्हणे | फिर्यादी (नि.क्र.४६) |
| २. | रामेश्वर पंडीत ब्राम्हणे | साक्षीदार (नि.क्र.४८) |

**आरोपीतर्फे पुरावा – काही नाही.**

**अभियोगपक्षातर्फे अथवा आरोपीतर्फे दस्तऐवज.**

| अनु.क्र. | नि.क्र. | तपशिल. |
|---|---|---|
| १. | नि.क्र.४७ | फिर्याद |
| २. | नि.क्र. ५० | वैद्यकिय प्रमाणपत्र |

**भाग –ड**

**मटेरिअल ऑब्जेट.**

| अनु. क्र. | मटेरिअल ऑब्जेट | तपशिल |
|---|---|---|
| १. | लिंबाची मोगरी | एक २० इंच लांबीची तिच्या एका बाजुने ११ इंच व दुस–या बाजुने ०९ इंच गोलाई तिच्या मधोमध सभोवती ०६ ते ०८ इंचाची साल दोन्ही टोकाची साल काढुन केलेली लिबांची मोगरी… |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक २४/०१/२०२५ रोजी अधिघोषित )

आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० चे १४३ (बेकायदेशीर जमाव जमविणे), १४७ (बेकायदेशीर जमाव जमवुन दंगा करणे), १४८ (बेकायदेशीर जमाव करुन प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होउन दंगा करणे), ३२६ (जिवघेण्या शस्त्राने इच्छापूर्वक गंभीर दुखापत करणे), ३२४ (चापटबुक्यांनी मारहाण करणे), ३२३ (इच्छापुर्वक दुखापत पोहचवणे), ५०४ (शांतताभंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे), सह कलम १४९ प्रमाणे शिक्षेस पात्र अपराधासाठी संपरिक्षा दिली आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत –**

**०२.** अभियोग पक्षाचे कथनाप्रमाणे, फिर्यादीच्या वडीलांनी सन २००१ मध्ये

बाजीराव रामा देवरे यांच्याकडून जामडी (ज) शिवार गट क्र.२२६ मधील ४ हे.११ आर जमीन विकत घेतली होती. त्याच शेतामध्ये फिर्यादी, त्यांचे भाऊ रामेश्वर,रख्माजी, वहिनी रेखा, आई नर्मदाबाई असे जामडी (ज) शिवार गट क्र.२२६ मधील शेतामध्ये एकत्र राहतात. त्यांचे वडील हे सन २०१३ साली मरण पावले. त्यांच्याकडे लहान–मोठया १५ बक–या आहेत. त्या बक–या फिर्यादी चारतात. दिनांक ०१.०७.२०२२ रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वाजे पर्यंत फिर्यादी त्याच्या कडील बक–या चारण्यासाठी डोंगरामध्ये गेले होते. ते दुपारी ०४.०० वाजता बक–या घेऊन घरी आले. त्यांच्या घरी त्यांचा भाऊ रामेश्वर, आई नर्मदाबाई असे असताना संध्याकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र. १ ते ६ हे फिर्यादीच्या घरी आले म्हणुन फिर्यादी व त्याचा भाऊ रामेश्वर घराच्या बाहेर आले. तेव्हा आरोपी क्र. १ फिर्यादीच्या भावाला म्हणाला की, 'मादरचोद कुत्रा माझ्या घरी येऊन माझी बायको लक्ष्मी हिला का मारले' असे म्हणुन शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा भाऊ रामेश्वर याच्या कानफटटीत मारली. त्यामुळे फिर्यादी त्याच्या भावाला सोडविण्यासाठी गेला असता आरोपी क्र. ३ याने फिर्यादीस पकडुन ठेवले व ईतर आरोपींनी त्यांना मोगरीने डोक्यात व छातीमध्ये मारले. त्यामुळे फिर्यादीच्या, तोंडातुन, नाकातुन, कानातुन रक्त आले. त्यांच्या भांडणाचा आवाज ऐकुन फिर्यादीची आई नर्मदाबाई, वहिनी रेखा ब्राम्हणे, काका सुरेश ब्राम्हणे , धनजी ब्राम्हणे, काकु सुनिताबाई ब्राम्हणे यांनी भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द पिशोर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पिशोर पोलिसांनी फिर्यादीस व फिर्यादीच्या भावास मेडीकल मेमो देऊन घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे पाठविले. त्यानंतर दिनांक ०५.०७.२०२२ रोजी उपचार घेऊन त्यांनी आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. आरोपीने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६,सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केलेचे तोहमत आहे. त्याप्रमाणे गुन्हा रजि. नं.१२८/२०२३ अन्वये नोंद केली व गुन्ह्याचा पुढील तपास व्ही. बी. पाटील, पो.ना./१०९३ पिशोर पोलिस ठाणे यांनी केला.

**०३.** सदर फिर्यादीप्रमाणे तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती पंचनामा व तपासाच्या अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविले तसेच सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी विरुध्द निशाणी क्र.३३ वर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ नुसार गुन्ह्याचा दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा मान्य नसल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली. अभियोग पक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले आहेत. पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत त्यामुळे त्यांचा पुरावा निशाणी क्र. ०१ वर आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन न आल्यामुळे आरोपीचा फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३१३ (१) (ब) चे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०५. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील विचाराधीन प्रश्न उपस्थितीत होतात. सदर विचाराधीन प्रश्नांवरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.नं.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक ०१.०७.२०२२ रोजी आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ बेकायदेशीर जमाव करुन त्या जमावाचा एक घटक झालात व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| **२.** | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ बेकायदेशीर जमाव करुन दंगा केला त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| **३.** | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ बेकायदेशीर जमाव करुन काठी यासारख्या प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होउन दंगा केला त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम १४८ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ बेकायदेशीर जमावाचा घटक होउन आरोपी क्र. ५ व ६ यांनी त्यांच्या हातातील लिंबाच्या मोगरीने फिर्यादीच्या डोक्यात, छातीत मारुन त्याच्या कानातुन, तोंडातुन व नाकातुन रक्त काढुन जिवघेण्या शस्त्राने गंभीर दुखापत पोहचवली त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| ५ | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ बेकायदेशीर जमावाचा घटक होउन आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीच्या डोक्यात व छातीत लिंबाच्या मोगरीने मारहाण केली त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| ६. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संनगमात करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादीस फिर्यादीच्या भावास लाथाबुक्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| ७. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपींनी संनगमात करुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी यांना उद्देशपुर्वक अपमानीत करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभित केले व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | **नाही.** |
| ८. | आरोपीविरुध्द इतर कोणताही गुन्हा शाबीत होतो काय ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ९. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत आली.** |

## का र ण मि मां सा.

**विचाराधीन प्रश्न क्रमांक १ ते ६ बाबत –**

०६. सर्व प्रश्नांचे उहापोह एकत्ररित्या अभिलेखावरील कागदपत्रे व पुराव्याच्या अनुषंगाने गोंधळ टाळण्यासाठी करण्यात येत आहे. प्रामुख्याने या ठिकाणी नमुद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षास, दिनांक ०१.०७.२०२२ रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० वाजे पर्यंत फिर्यादी त्याच्या कडील बक–या चारण्यासाठी डोंगरामध्ये गेले होते. ते दुपारी ०४.०० वाजता बक–या घेऊन घरी आले. त्यांच्या घरी त्यांचा भाऊ रामेश्वर, आई नर्मदाबाई असे असताना संध्याकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र. १ ते ६ हे फिर्यादीच्या घरी आले म्हणुन फिर्यादी व त्याचा भाऊ रामेश्वर घराच्या बाहेर आले. तेव्हा आरोपी क्र. १ फिर्यादीच्या भावाला म्हणाला की, 'मादरचोद कुत्रा माझ्या घरी येऊन माझी बायको लक्ष्मी हिला का मारले' असे म्हणुन शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीचा भाऊ रामेश्वर याच्या कानफटटीत मारली. त्यामुळे फिर्यादी त्याच्या भावाला सोडविण्यासाठी गेला असता आरोपी क्र. ३ याने फिर्यादीस पकडुन ठेवले व ईतर आरोपींनी त्यांना मोगरीने डोक्यात व छातीमध्ये मारले. त्यामुळे फिर्यादीच्या, तोंडातुन, नाकातुन, कानातुन रक्त आले. त्यांच्या भांडणाचा आवाज ऐकुन फिर्यादीची आई नर्मदाबाई, वहिनी रेखा ब्राम्हणे, काका सुरेश ब्राम्हणे, धनजी ब्राम्हणे, काकु सुनिताबाई ब्राम्हणे यांनी भांडणाची सोडवासोडव केली. सदर कथनांच्या अनुषंगाने विविध कलमे अंतर्गत व गुन्ह्याचे विवेचन अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याच्या साहाय्याने करणे आवश्यक आहे.

०७. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी सरकार पक्षाने एकुण दोन साक्षीदार तपासले आहेत. अभियोगपक्षाने साक्षीदार भारत पंडीत ब्राम्हणे (फिर्यादी निशाणी–४६), साक्षीदार क्र. २ रामेश्वर पंडीत ब्राम्हणे (निशाणी–४८) वर नोंदविली आहे. सदर साक्षीदार यांनी त्यांचे सरतपासात असे कथन आहे की, त्यांची शेती जामडी

शिवारात गट क्र. २२६ येथे आहे. ते सर्व आरोपींना ओळखतात. सदरची घटना सन २०२२ ला घडली होती. त्यांच्यात व आरोपीमध्ये किरकोळ वाद झाले होता. साक्षीदार क्र. १ फिर्यादी भारत पंडीत ब्राम्हणी याने रागाच्या भरात त्यांनी आरोपींविरुध्द पोलिस ठाणे येथे तक्रार दिली होती. त्यांना ती तक्रार दाखवण्यात आली. ती तीच असून त्यावर साक्षीदार क्र. १ त्यांचा सही आहे. सदरची सही त्यांनी ओळखला आहे. त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे त्यांने सांगितले आहे. त्यास निशाणी क्र.४७ देण्यात आली आहे. सदर साक्षीदाराने घटनेबाबत काही सांगितले नाही. त्यांनी आरोपी विरुध्द कोणतीही साक्ष दिली नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द लादण्यात आलेल्या आरोपांचे अनुषंगाने या साक्षीदाराची साक्ष महत्वाची साक्ष असुन अभियोगपक्षाला त्यातुन काही प्राप्त झाले नाही.

०८. प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष पाहीली असता साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनांनुसार कोणताही पुरावा दिलेला नाही. साक्षीदार आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा देत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारले असता, त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. उलट, त्यांनी अभियोग पक्षाच्या सर्व प्रश्नांना धुडकावून लावले. विशेषतः साक्षीदार फिर्यादी यांना आरोपींनी संगणमत करुन समान उद्दीष्ट पुर्ततेसाठी बेकायदेशीर जमाव करुन त्या जमावाचा एक घटक झाले व बेकायदेशीर रित्या जमाव करुन दंगा केला, तसेच काठीसारख्या प्राणघात हत्यारानिशी सज्ज होउन दंगा केला. तसेच फिर्यादीच्या लिंबाची मोगरीने डोक्यात व छातीवर मारहाण केली त्यामुळे फिर्यादीच्या नाकातुन, तोंडातुन व कानातुन रक्त आहे. तसेच फिर्यादीच्या भावास कानफटटीत मारुन दुखापत केली शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण करुन दिल्याचे नाकारले आहे.

०९. सदर साक्षीदार व फिर्यादी ही फितूर झाल्यामुळे अभियोग पक्षाकडे प्रस्तुत कामात पावले उचलण्यास कोणतेही कारण उरलेले नव्हते. विशेषतः येथे नमुद करणे योग्य आहे की, साक्षीदार ही फिर्यादी आहे. त्यामुळे, जरी फिर्यादबाबत फक्त सही केल्याचे म्हंटले आहे पण, त्यातील मजकुराबाबत कोणतीही साक्ष दिली नाही. त्यामुळे, फिर्याद सुध्दा शाबीत झालेली नाही. म्हणून या बाबीवर अभियोग पक्षास आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्यास अडचणीचे होत आहे. तसेच, याकामी अभियोगपक्षाने इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाही. जरी आरोपींनी निशाणी ४९ वर घटनास्थळ पंचनामा, निशाणी

५० वर जखमींचे प्रमाणपत्र मान्य केले असले तरी उलटतपासात साक्षीदाराने स्पष्टपणे सांगितले की, आरोपी व त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात समझोता झाला आहे व त्यांची आरोपीविरुध्द कुठलीही तक्रार राहीलेली नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात पुरेसा पुरावा समोर न आणल्यामुळे आरोपीविरुध्द लादण्यात आलेले आरोप सिध्द होवू शकले नाही. सबब, विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. ७ –</u>**

**१०.** फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये आरोपींनी शिवीगाळ व उद्देशपुर्वक अपमानीत होईल असे प्रक्षोभित केले असे कोणतेही कथन केलेले नाही. तसेच, अभियोग पक्षाने इतर कोणताही पुरावा याकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे, सदर गुन्ह्याचे महत्वपूर्ण घटक याकामी सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपींना या आरोपांसाठी कोणतेही दोष लावण्यात येवू शकणार नाही. सबब, विचाराधीन प्रश्न क्र.७ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. ८ व ९ –</u>**

**११.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार व समोर आणलेले अभिलेखावरील कागदपत्रांवरुन आरोपींविरुध्द कोणतेही गुन्हा सिध्द होत नाही तसेच, इतर कोणताही गुन्हा घडल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द कोणतीही विपरीत परिस्थीती आढळुन येत नाही. त्यामुळे, विचाराधीन प्रश्न क्र. ८ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.फिर्याद प्रमाणे साक्ष न देत असल्यामुळे त्यांना कोणतेही नुकसान भरपाई फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३५७ प्रमाणे देण्यास कोणतेही कारण नाही. फिर्यादी अभियोगपक्षाला साथ न देत नसल्यामुळे अभिलेखाचे तसेच वरील चर्चेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीं विरोधात कोणताही पुरावा आला नसल्याने आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, विचाराधीन प्रश्न क्र.९ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आ दे श

१. आरोपी क्र.**१. गणेश महादु ब्राम्हणे, २.शंकर महादु ब्राम्हणे, ३.अनिल महादु ब्राम्हणे, ४. परमेश्वर नारायण दुधे , ५. रवि राजु दुधे, ६. विष्णु नाना दुधे ,** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिता,१८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. याकामी जप्त झालेला मुदे्दमाल एक २० इंच लांबीची तिच्या एका बाजुने ११ इंच व दुस–या बाजुने ०९ इंच गोलाई तिच्या मधोमध सभोवती ०६ ते ०८ इंचाची साल दोन्ही टोकाची साल काढुन केलेली लिबांची मोगरी मुल्यहिन असल्यामुळे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १०,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

५. आरोपीला इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास सोडण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.01.27 10:51:18 +0530

**दिनांक – २४/०१/२०२५.**
**ठिकाण – कन्नड.**

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र / आदेश या मधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र / आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :– | आर. एस. टाकळकर |
| न्यायालयाचे नांव | :– | **काटकर विजया एन.एस.**<br>२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :– | २४.०१.२०२५ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :– | २४.०१.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :– | २४.०१.२०२५ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :– | २४.०१.२०२५ |

––––––––––––––––––––––––––